# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
## (पदोन्नतीच्या पदावर प्रतिनियुक्ती/समावेशन)

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे कार्यालयातील खालील तक्यात नमूद संवर्गातील पदोन्नतीची पदे शासकीय विभाग / स्थानिक स्वराज्य संस्था/ महामंडळे/ प्राधिकरणे इत्यादी संस्थांमधील समकक्ष पदावर कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे मधून प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत. तरी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे कार्यालयात पदोन्नतीचे पदावर प्रतिनियुक्तीवर येण्यास इच्छूक अधिकारी/कर्मचारी यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | प्राधिकरणातील प्रतिनियुक्तीने भरावयाची पदे | संवर्ग | वेतनस्तर/वेतनश्रेणी | शासकीय विभाग / स्थानिक स्वराज्य संस्था/ महामंडळे/ प्राधिकरणे मधिल समकक्ष पद | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | अधिक्षक अभियंता (स्थापत्य) | गट-अ | s-25 (78800-209200) | अधिक्षक अभियंता (स्थापत्य) | 2 |
| 2 | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | गट-अ | s-23 (67700-208700) | कार्यकारी अभियंता (स्था.) | 1 |
| 3 | विभागीय अग्निशमन अधिकारी | गट-ब | s-16 (44900-142400) | विभागिय अग्निशमन अधिकारी | 2 |
| 4 | अग्निशमन केंद्र अधिकारी | गट-ब | s-15 (41800-132300) | अग्निशमन केंद्र अधिकारी | 6 |
| 5 | मुख्य आरेखक | गट-ब | s-15 (41800-132300) | मुख्य आरेखक | 1 |
| 6 | लघुलेखक निम्न श्रेणी | गट-क | s-14 (38600-122800) | लघुलेखक निम्न श्रेणी | 1 |
| 7 | प्रमुख भूमापक | गट-क | s-14 (38600-122800) | प्रमुख भूमापक | 1 |
| 8 | उप अधिक्षक / उप लेखापाल | गट-क | s-13 (35400-112400) | उप अधिक्षक / उप लेखापाल | 9 |
| 9 | सहाय्यक आरेखक | गट-क | s-10 (29200-92300) | सहाय्यक आरेखक | 1 |
| 10 | वरिष्ठ लिपीक | गट-क | s-8 (25500-81100) | वरिष्ठ लिपीक | 17 |
| 11 | परिरक्षा भूमापक | गट-क | s-8 (25500-81100) | परिरक्षा भूमापक | 3 |
| 12 | लिपीक टंकलेखक | गट-क | s-6 (19900-63200) | लिपीक टंकलेखक | 4 |
| **एकूण गट अ + ब + क** | | | | | **48** |

उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केलेल्या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक समकक्ष पदावर काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे लक्ष महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्हि-2011/ प्र.क्र.137/ कार्यासन-12 दिनांक 17/12/2016 मधिल सुचना व अटी व शर्तीकडे वेधण्यात येत असून इच्छुक अधिकारी/कर्मचारी यांनी आपला अर्ज मा. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे-411 044 यांचे कडे यांच्या नावाने टपालाद्वारे अथवा **ad.pmrda@gmail.com** या ईमेल आयडी वर विहित कालावधीत कार्यालयीन वेळेत सादर करावा.

इच्छुक अधिकारी /कर्मचारी यांनी या सोबतच्या विहीत नमुन्यातील **प्रपत्र- "अ"** नुसार माहीती, आवश्यक कागदपत्रासह व विनंती अर्जासह परिपुर्ण प्रस्ताव महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांना **दिनांक** 16/12/2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठवावा. सदर कालावधीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

प्रतिनियुक्ती कालावधीच्या 2 वर्षाच्या सेवेचे मुल्यमापन करून संबधित अधिकारी / कर्मचारी यांनी इच्छा दर्शविल्यास समावेशनाचे धोरणास शासनाची मान्यता प्राप्त झाल्यावर अधिकारी / कर्मचारी यांची पदोन्नतीच्या पदावर शासनाच्या पदोन्नतीबाबतचे प्रचलित धोरण तसेच विषेश अनुमती याचिका क्र. 28306/2017 मधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहुन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कायमस्वरूपी समावेशनाबाबत विचार करण्यात येईल.

**सह आयुक्त, प्रशासन**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे**